उत्तर प्रदेश राज्य सरकार

विरूद्ध

खुशी राम

१ एप्रिल.१९६०रोजी याद्वारे निकाल

(जाफर इमाम आणि ए. के. सरकारन्यायमूर्ती).

फौजदारी खटला-दंडाधिकाऱ्याला शिक्षा ठोठावण्याचा अधिकार-इतके अधिकार नसल्याच्या समजुतीपोटी सत्र न्यायालयाटत खटला पाठविला.-त्याची वैधता -अन्न भेसळ प्रतिभंधक कायदा, १९५४ (१९५४ चा ३७), कलम ७, १६ आणि २१ व फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा V), कलम ३२, २०७ आणि ३४७.

अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ च्या कलम ७ अन्वये सामनेवालावर गुन्हा दाखल करण्यात आला. न्यायदंडाधिकाऱ्यास गुन्हे सिद्ध झाल्याचे आढळले आणि त्यांना पुढे आढळले की सामनेवाल्याने तिसऱ्यांदा गुन्हा केला ज्यासाठी तो जबाबदार आहे व कमीत कमी दोन वर्षे कारावास आणि कमीत कमी3000 रुपये दंड अशी शिक्षा कायद्याचा कलाम 21 अन्वये ,ठोठावण्याचा विशेष अधिकार न्यायदंडाधिकाऱ्यास देण्यात आला आहे. परंतु त्यांचा असा समाज होता की फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 32 नुसार समानेवालाला शिक्षा ठोठावण्याचा न्यायदंडाधिकाऱ्याचा अधिकार मर्यादित केला ज्यामुळे त्यांनी समानेवालाचा खटला सत्र न्यायालयासमोर चालविणेसाठी वर्ग केला. सत्र न्यायालयाने सामानेवालास दोषी ठरवले आणि शिकशा दिली,. अपिलावर उच्च न्यायालयाने न्यायदंडाधिकाऱ्यांना

खटला वर्ग करण्याचा अधिकार नाही आणि सत्र न्यायाधीशांना खटला चालविण्याचा अधिकार नाही, असा निर्वाळा दिला आणि शिक्षा रद्द केली आणि प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी दंडाधिकाऱ्यांकडे पाठवले.

त्यावर असे नमूद करण्यात आले की सत्र न्यायाधीशाकडे खटला वर्ग करणे बेकायदेशीर नाही. सत्र न्यायाधीशांना खटला चालविण्याचा अधिकार आहे. या कायद्याचे कलम २१ ही अक्षम करणारी तरतूद नाही आणि कायद्याने विहित केलेली संपूर्ण शिक्षा देण्यास न्याय दंडाधिकारी सक्षम असले तरी खटला वर्ग करण्याचे त्यांचे अधिकार काढून घेतले जात नाहीत. न्यायदंडाधिकाऱ्याकडे खटला वर्ग करण्याचे अधिकार आणि प्रादेशिक अधिकार क्षेत्र दोन्ही होते आणि खटला वर्ग करण्याची कृती चांगली होती.

फौजदारी अपील अधिकार क्षेत्र : १९५९ चे फौजदारी अपील क्रमांक १६०.

१९५६ च्या फौजदारी सत्र खटला क्रमांक १०२ मध्ये बाराबंकी येथील दुसऱ्या तत्कालीन दिवाणी व सत्र न्यायाधीशांच्या १२ फेब्रुवारी १९५७ च्या निर्णय व आदेशावरून उद्भवलेल्या १९५७ च्या फौजदारी अपील क्रमांक १०५ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या (लखनौ खंडपीठ) निर्णय व आदेशावरून विशेष अनुमती द्वारे अपील करण्यात आले.

याचिकाकर्त्यासाठी जी.सी. माथुर आणि सी.पी.लाल - --

प्रतिवादी हजर झाला नाही.

1960. 1, एप्रिल रोजी न्यायालयाचा निर्णय याद्वारे देण्यात आला.

न्यायमूर्ती सरकार,: सामनेवालावरवर यापूर्वी बाराबंकी येथील न्यायदंडाधिकाऱ्यापुढे. भेसळयुक्त दूध विक्री आणि विनापरवाना दूध विक्री केल्याप्रकरणी अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा 1954 कलम 7 च्या उपकलम (1) आणि (3) अन्वये खटला चालविण्यात आला. विद्वान न्यायदंडाधिकाऱ्यांना असे आढळले की गुन्हे सिद्ध झाले आहेत आणि

सामानेवालाने तिसऱ्यांदा गुन्हे केले आहेत. या कायद्याच्या कलम १६ च्या उपकलम (१) च्या कलम (अ) (३) अन्वये विशेष व पुरेशी कारणे नसताना तिसऱ्या गुन्ह्यासाठी दोन वर्षांपेक्षा कमी कारावास व तीन हजार रुपये पेक्षा कमी दंड आकारता येणार नाही. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३२ नुसार प्रथम श्रेणी न्यादंडाधिकारी रुपये 2000 पेक्षा अधिक दंड आकारू शकत नाही.प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी यांचे अधिकार संहितेच्या कलम 32 नुसार मर्यादित केले आहेत अशा समजुतीत ते होते. म्हणून न्यायदंडाधिकाऱ्यांनी समानेवाला यांचा खटला सत्र न्यायालयापुढे चालविण्यासाठी वर्ग केला.

न्यायदंडाधिकाऱ्यांना रुपये 2000 पेक्ष्या अधिक दंड आकारण्याची मर्यादा संहितेच्या कलम ३२ नुसार मर्यादित होती. म्हणून न्यायदंडाधिकाऱ्यांनी सत्र न्यायालयासमोर खटला चालविण्यासाठी वर्ग केला. बहुधा ही कार्यवाही संहितेचे कलाम 347 नुसार केली आहे.

त्यानंतर बाराबंकीच्या विद्वान सत्र न्यायाधीशांनी समानेवालावर खटला चालवला आणि ज्या गुन्ह्यांमध्ये त्याच्यावर आरोप ठेवण्यात आले होते त्या गुन्ह्यांमध्ये त्याला दोषी ठरवले. मात्र, हे गुन्हे प्रतिवादीने तिसऱ्यांदा नव्हे तर दुसऱ्यांदा केले आहेत, असा निष्कर्ष विद्वान सत्र न्यायाधीशानी काढला. .दुसऱ्या गुन्ह्यासाठी कायद्याने ठरवून दिलेली किमान शिक्षा सुनावण्यास विद्वान न्यायदंडाधिकारी सक्षम असून त्यांनी हे प्रकरण सत्र न्यायालयात अजिबात वर्ग करायला नको होते, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. मात्र, त्यांनी समानेवालास दोषी . ठरवून दुसऱ्या गुन्ह्यासाठी कायद्याने ठरवून दिलेली किमान शिक्षा म्हणजे एक वर्ष सक्तमजुरी व दोन हजार रुपये दंड व प्रत्येक गुन्ह्यासाठी दंड न भरल्यास आणखी सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा सुनावली व तुरुंगवासाची शिक्षा एकत्रित भोगण्याचे आदेश दिले.

त्यानंतर प्रतिवादीने अलाहाबाद येथील उच्च न्यायालयात अपील केले. न्ययमूर्ती मुल्ला, यांनी या अपिलावर सुनावणी करताना असे

निदर्शनास आणून दिले . की, विद्वान न्यायदंडाधिकाऱ्यांनी कायद्याच्या कलम २१ मधील तरतुदींकडे दुर्लक्ष केले आहे. संहितेच्या कलम ३२ मध्ये काहीही नमूद असले तरी प्रथम श्रेणीच्या न्यायदंडाधिकाऱ्यांना संहितेच्या कलम ३२ अन्वये त्याच्या अधिकारांपेक्षा अधिक कायद्याने अधिकृत केलेली कोणतीही शिक्षा देणे कायदेशीर असेल. विद्वान न्यायाधीशांनी असे निरीक्षण नोंदवले की विद्वान दंडाधिकारी म्हणूनच कायद्याला आवश्यक असलेल्या सर्व शिक्षा देण्यास सक्षम आहेत आणि प्रतिवादीला सत्र न्यायालयात हजर करण्याचे कोणतेही कारण नाही. 'सत्र न्यायालय केवळ त्याच प्रकरणांचा खटला चालवू शकते जे न्यायदंडाधिकाऱ्याने कायदेशीर आणि योग्यरित्या वर्ग केलेले आहेत आणि कायद्याचे कलम २१ मुळे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांना खटला वर्ग करण्यापासून रोखले आहे. ही केवळ सक्षम तरतूदच नाही तर अक्षम देखील आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. , त्यांनी असे म्हटले की कायद्याच्या कलम 21 मुळे खटला सत्र न्यायाधीशांकडे वर्ग करण्यापासून रोखले आहे.

फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अधिकारांवर कितीही मर्यादा घातल्या असल्या तरी त्यांना शिक्षा देण्याची विशेष तरतूद विशेष कायद्यात करण्यात आली असेल, तर सामान्य कायद्याची तरतूद विचारात घेता येणार नाही. आणि अशावेळी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४७ मधील तरतुदी लागू करता येत नाहीत.

या संदर्भात त्यांनी असे म्हटले की, विद्वान न्यायदंडाधिकाऱ्यांना समानेवालाला खटल्यासाठी सत्र न्यायालयात हजर करण्याचा अधिकार नाही आणि विद्वान सत्र न्यायाधीशांना खटल्याचा खटला चालविण्याचा अधिकार नाही. त्यानंतर त्यांनी प्रतिवादीविरुद्ध दिलेला दोषसिद्धीचा आदेश व शिक्षा रद्द बातल ठरवली आणि हे प्रकरण बाराबंकीच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे वर्ग करून खटला व निपटारा करण्यासाठी सक्षम दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात वर्ग करण्याचे आदेश दिले. मुल्ला, जे. यांच्या निर्णयाविरोधात राज्य सरकारने या न्यायालयात अपील केले आहे.

मुल्ला, जे. यांच्या मताशी आम्ही सहमत नाही, की विद्वान सत्र न्यायाधीशांना खटला चालवण्याचा अधिकार नव्हता. या कायद्यातील कलम २१ ही अक्षम करणारी तरतूद आहे, असे आम्हाला वाटत नाही. संहितेच्या कलम ३२ अन्वये ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त शिक्षा सुनावण्याचा अधिकार प्रथम न्यायालयाच्या दंडाधिकाऱ्यांना देणे एवढेच ते करतात. याचा संहितेच्या कलम २०७ व ३४७ मधील तरतुदींवर परिणाम होत नाही किंवा सत्र न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राशीही त्याचा काहीही संबंध नाही. कायद्याने विहित केलेली पूर्ण शिक्षा देण्यास सक्षम दंडाधिकाऱ्यांना हे कलम खटला वर्ग करण्याचे अधिकार रद्दबातल ठरवत नाही, तसेच हे कलम सत्र न्यायालयाच्या त्यांचेकडे वर्ग केलेला खटला चलविणेचे अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप करत नाही.

सत्र न्यायालयाचे कार्यक्षेत्र संहितेवर अवलंबून असते. त्यांच्याकडे वर्ग केलेला कोणत्याही खटला चालविण्याचा त्यांना अधिकार आहे. समानेवालाविरुद्धचा खटला एका सक्षम न्यायदंडाधिकाऱ्याने सत्र

न्यायालयात वर्ग केला होता. शिवाय, दंडाधिकाऱ्यांना खटला वर्ग करण्याचे प्रादेशिक अधिकार क्षेत्र दिले नाही. असेही होऊ शकते की दंडाधिकारी खटला चालविण्यास आणि कायद्याने विहित केलेल्या सर्व शिक्षा देण्यास सक्षम होते. दंडाधिकाऱ्यांना हे प्रकरण सत्र न्यायालयात वर्ग करण्याची सक्ती करण्यात आली नाही, हेही खरे आहे. अशापरिस्थितीत सत्र न्यायालयात खटला वर्ग करण्याची कृती निरर्थक होती या मताशी सहमत होण्यास आम्ही असमर्थ आहोत

कायद्याच्या कलम २१ वगळता विद्वान दंडाधिकारी स्वत: जास्तीत जास्त शिक्षा देऊ शकले असते त्यांनी खटला सत्र न्यायालयात वर्ग करणे हे निरर्थक होते म्हणून हा निर्णय त्यांना अमान्य होता, असे न्यायमूर्ती मुल्ला, . यांचे मत ही आपल्याला समजत नाही. आम्ही असे म्हटले आहे की कलम २१ मध्ये दंडाधिकाऱ्यांना तसे अधिकार असतील तर त्यांचे खटला सत्र न्यायालयाकडे वर्ग करण्याचे अधिकार काढून घेतले जात नाही. किंवा सत्र न्यायालयाकडे खटला वर्ग केल्यावर तो

चालविण्याच्या त्यांना पूर्ण अधिकार आहे. तसे करण्याचा अधिकार असलेल्या दंडाधिकाऱ्यांनी वर्ग केलेला खटला चालविण्याच्या सत्र न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रावर परिणाम होत नाही. म्हणून समानेवालाविरुद्ध खटला चालविण्याचा पूर्ण अधिकार विद्वान सत्र न्यायाधीशांना होता, असे आम्हाला वाटते.

परिणामी आम्ही अपील मंजूर करतो. आणि उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करतो. आता हे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे सुनावणीसाठी पुन्हा उच्च न्यायालयात जाणार आहे.

अपील मंजूर.

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता

वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x